अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या Accounts Management Related Services (AMRS) करीता सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः विसउस/कार्या-१७(संगणकीकरण)/प्र.क्र. १२५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २० सप्टेंबर, २०१९

<u>वाचा :-</u>

१) या विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/प्र.क्र.७६/संगणक कक्ष दि.२५/०१/२०११
२) या विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१०/प्र.क्र.६६/संगणक कक्ष दि.२३/०६/२०११

<u>प्रस्तावना :-</u>

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागांतर्गत वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालयात मुंबई व ठाणे शहर या शहरी भागाकरिता आणि जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांचे नावे असलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यातून जिल्हा पुरवठा अधिकारी व अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्यामार्फत अन्नधान्याच्या खरेदी व विक्रीचे व्यवहार होत असल्यामुळे याचे लेखे वाणिज्यिक पद्धतीने ठेवले जातात. यामध्ये ट्रेडिंग अकाऊंट, स्टोअर अकाऊंट, स्टॉक अकाऊंट, प्रॉफिट ॲण्ड लॉस अकाऊंट, बॅलन्सशीट, इत्यादी प्रकारे लेखे ठेवण्याचे काम प्रत्येक जिल्ह्यात केले जाते व या लेख्यांचे एकत्रिकरण राज्य स्तरावर वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचेमार्फत केले जाते. या सर्व बाबी विभागाकडे उपलब्ध असलेल्या फुड मॅन्युअलनुसार केल्या जातात. या विभागाचे लेखे वाणिज्यिक स्वरुपाचे असल्याने तश्या स्वरुपाचे काम करणारे प्रशिक्षित मनुष्यबळ या विभागाकडे उपलब्ध नसल्याने, लेखे तयार करताना त्यामध्ये अचूकता येत नाही. त्यामुळे या विभागामार्फत तयार करण्यात येणाऱ्या प्रपत्र लेख्यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रुटी असल्याची बाब महालेखापाल कार्यालयाने निदर्शनास आणून दिली आहे. महालेखापाल यांनी घेतलेल्या आक्षेपानुसार व वित्त विभागाने या विभागाचा स्वीय प्रपंजी लेखा व एकुण आर्थिक बाबींमध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने विभागाकडे उपलब्ध असलेले पूर्वीच्या लेख्यातील त्रुटी दूर करून लेखे सुधारीत करणे, वित्तीय बाबींचे संगणकीकरण करण्यासाठी सर्व वित्तीय बाबींमध्ये व व्यवस्थेमध्ये आणि फुड

मॅन्युअलमध्ये सुधारणा करण्याकरीता सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

सद्याच्या लेखा प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी व प्रपत्र लेखे सुधारीत करणे, प्रपत्र लेखे बनविण्याची प्रक्रिया सुधारीत करणे, प्रपत्र लेखे बनविण्यासाठी संगणक प्रणालीचा वापर, योजनांचे हिशोब पूर्ण करणे आणि फुड मॅन्युअल मध्ये सुधारणा करणे याकरिता सनदी लेखापाल संस्थेची निवड करण्याकरीता वित्त विभागाने त्यांचे दि. २०/१०/२०१८ चे अभिप्रायानुसार सहमती दर्शविली आहे.

२. त्यास अनुसरून विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि. २२/०४/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार Request for Proposal (RFP), DPR ला मान्यता आणि सदर प्रकल्पासाठी येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या रुपये २,३७.६० लक्ष एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुसार Chartered Accountant Firm ची निवड करताना QCBS (Quality Cost Based Selection) पध्दतीने ६०:४० (Technical : Commercial) च्या गुणोत्तरानुसार करण्याबाबत समितीने सुचविले.

३. उपरोक्त मान्यतेनुसार Accounts Management Related Services (AMRS) उपलब्ध करुन घेण्यासाठी संस्थेची नियुक्ती करण्याकरीता Request for Proposal (RFP) दि.११ जून, २०१९ रोजी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले.

४. प्रसिध्द करण्यात आलेल्या Request for Proposal (RFP) ला एकुण ८ (आठ) सनदी लेखापालांच्या संस्थांनी प्रतिसाद दिला.

५. तांत्रिक मूल्यमापनाच्या Pre-Qualification Criterion मधील टप्पा क्रमांक PQ_५ मध्ये M/s. Rao and Emmar Chartered Accountant आणि Technical Evaluation Criterion मधील टप्पा क्र.TQ_४ मध्ये M/s Rama K Gupta & Co. आणि SPMR & Associates या सनदी लेखापालांच्या संस्था अपात्र ठरलेल्या आहेत.

६. पात्र ५ संस्थांचे तांत्रिक मूल्यमापन दि. १३ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर करण्यात आले. या ५ संस्थांचे Commercial Bid दि. ०५ सप्टेंबर, २०१९ रोजी उघडण्यात

आले. सदर ५ (पाच) पात्र संस्थांकडून प्राप्त दरपत्रके, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर दि. ११ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आली.

७. सर्वाधिक गुण व न्यूनतम दर प्राप्त झाल्यामुळे QCBS पध्दतीने मेसर्स बोरकर आणि मुझुमदार सनदी लेखापाल या संस्थेची विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेनुसार निवड करण्यात आली. निवड झालेल्या मेसर्स बोरकर आणि मुझुमदार सनदी लेखापाल या संस्थेच्या दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

अ.क्र.	QCBS पध्दतीने एल-१ ठरलेली संस्था	अंतिम दर (₹.)	कराराचा कालावधी
१.	मेसर्स बोरकर आणि मुझुमदार, सनदी लेखापाल	रु.९७.०० लक्ष + कर अतिरिक्त	कामाचे आदेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून एक वर्ष

८. Request For Proposal (RFP) व Master Service Agreement (MSA) मधील अटी व शर्ती मेसर्स बोरकर आणि मुझुमदार सनदी लेखापाल संस्था यांना बंधनकारक असतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९२११७३२०२९५०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satyavan Kishanrao Ubale

Digitally signed by Satyavan Kishanrao Ubale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=46312f6d99372bbfaa1abf8afd92601cfe82b77598529968ecb9b717b86ddc13, serialNumber=cfdaf958228a997f0edd8c32876eb1e49285efc7850109e7abb75654a9030a24, cn=Satyavan Kishanrao Ubale
Date: 2019.09.21 17:24:17 +05'30'

(स. कि. उबाळे)
वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव
५) मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

७) अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
९) सर्व प्रशासकीय विभागाचे सचिव
१०) महालेखापाल,लेखा व अनुज्ञेयता (I), मुंबई/ (II), नागपुर
११) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा यांचे कार्यालय,बांद्रा, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई
१४) सर्व जिल्हाधिकारी
१५) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
१६) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१७) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१८) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१९) उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
२०) सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२२) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला,विधान भवन,मुंबई.
२३) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये
२४) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य
२५) सर्व विरोधी पक्षनेते.
२६) निवड नस्ती (संगणकीकरण).